**कृपया प्रसिध्दीसाठी -** **3 ऑक्टोबर 2013**

## पेट्रोल पंपांवर छोटे गॅस सिलेंडर देणे चुकीचे : राम नाईक

**मुंबई, गुरुवार:** ‘‘दिल्ली, मुंबई, कोलकाता, बंगलूर यांसारख्या महानगरांमध्ये पेट्रोल पंपांवर विनाअनुदानित पाच किलोचे गॅस सिलेंडर उपलब्ध करण्याची घोषणा काल पेट्रोलियम मंत्री डॉ. मोईली यांनी केली आहे. ज्या मूळ उद्देशाने वाजपेयी सरकारने 5 किलोचे सिलेंडर बाजारात आणले तो उद्देशच या निर्णयाने विफल होणार आहे. गरीबांना 14.2 किलोचा सिलेंडर परवडत नाही, तसेच दुर्गम पहाडी भागात एवढ्या जड सिलेंडरची डोक्यावरुन ने-आण करणे कठीण आहे, म्हणून आम्ही हे सिलेंडर प्रथम उपलब्ध केले होते’’, अशी टीका माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी केली.

या संदर्भात काढलेल्या पत्रकात श्री. राम नाईक म्हणतात,‘‘सवंग प्रसिद्धीसाठी हा निर्णय मनमोहन सिंह सरकारने घेतला आहे. महानगरांमध्ये पेट्रोल पंपांवर पाच किलोचे सिलेंडर सुरक्षितपणे ठेवणार कसे? त्यांची नोंद कशी ठेवणार? तसेच ते हाताळण्यासाठी पंपांवरील कर्मचा-यांना प्रशिक्षण दिले आहे का? हे मुद्दे सुरक्षिततेच्या अतिशय महत्त्वाचे आहेत. वाढता दहशतवाद लक्षात घेता यातील धोके कसे टाळणार यावर पेट्रोलियम मंत्र्यांनी काहीही विचार केलेला नाही. गरीबांसाठी म्हणून तयार केलेले हे 5 किलोचे सिलेंडर विनाअनुदानाने मुंबईत रु. 362 ला मिळणार आहेत याउलट 14.2 किलोचा अनुदानित सिलेंडर त्यापेक्षा थोड्याच जास्त किंमतीत म्हणजे रु. 441 ला मिळणार असताना हा उपक्रम यशस्वी होणे तसेही कठीणच आहे.  विद्यमान गॅस ग्राहकांनाही हे मिळणार किंवा काय बाबतही स्पष्टीकरण गरजेचे आहे.’’

आपल्या गॅस वितरकाबद्दल ग्राहक असमाधानी असतील, तर वितरक बदलण्याचा पर्याय देण्याच्या पेट्रोलियम मंत्री डॉ. मोईली यांच्या निर्णयाचे मात्र श्री. नाईक यांनी स्वागत केले.  सामान्य ग्राहकांची पिळवणूक काही अंशी थांबेल, तसेच वितरकांना चांगली सेवा देणे यामुळे भाग पडेल, अशी आशा श्री. नाईक यांनी पत्रकाच्या अखेरीस व्यक्त केली आहे.

**(कार्यालय सचिव)**